नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 12/06/2021 (शनिवार)

(दुपार)

---

## फसवणुक

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 1 कि मी अंतरावर दुर्गा मंदीर चौक वार्ड क्र. 6 पिपरी कन्हान येथे दिनांक 11/11/2020 चे 11.00 वा. ते दिनांक 15/02/2021 चे 18.00 वा. दरम्यान आरोपी क्र 1) डॉ. राकेश वर्मा, रा. लोकमान्य टिळक मेडीकल कॉलेज सायन मुबंई, 2) शेखर राय उर्फ चंद्रशेखर आत्राम रा. सेमीनरी हिल्स नागपुर, 3) राजेश गुहा, रा. सेक्टर 20 खारघर नवी मुबंई व 4) राकेश वर्मा याचा चपरासी, रा. लोकमान्य टिळक मेडीकल कॉलेज सायन मुबंई यांनी संगणमत करून फिर्यादी नामे– हरिष मोतीराम तिवाडे, वय 52 वर्ष, रा. दुर्गा मंदीर चौक वार्ड क्र. 6, पिपरी यांचा विश्वास संपादन करून फिर्यादी यांची मुलगी हिचा ''सरकारी कोट्यातुन एम.बी.बी.एस या वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी ॲडमीशन करून देतो'' असे खोटे सांगुन फसवणुक करण्याचा उद्देशाने फिर्यादी कडुन वेळोवेळी ॲडमिशन करिता 11,09,200/– रूपये घेतले व फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 420, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि जावेद शेख 9403692766 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत मौदा कोर्ट समोर येथे दिनांक 10/05/2021 चे 08.30 वा. दरम्यान आरोपी नामे– विलास नारायण गणविर, रा. मांगली याने खोटया नावाने व पोलीसाची वेशभुषा धारन करुन फिर्यादी नामे– हेमराज केशव समर्थ, वय 45 वर्ष, रा. मांगली गोसावी मौदा व त्याचे मित्रास पोलीस खात्यात पोलीस चालक या पदावर नौकरी लावून देतो असे म्हणुन प्रत्येकी 2,00,000/– रु. असे एकुण 4,00,000/–रू. घेवुन त्यांची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 420, 419, 170, 171 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सोनेकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर